# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. २३६/२०१९ दिनांक २३/०७/२०१९**

## १) घरफोडी :-

**अ)कंधार :-** दिनांक २१.०७.२०१९ रोजी चे २३.०० वा. ते दि. २२.०७.२०१९ चे ०५.३० वा. चे दरम्यान, मौ. पाखर्णी ता. कंधार जि. नांदेड येथे, यातील फिर्यादी व त्यांची पत्नी घरात झोपले असता कोणीतरी आज्ञात आरोपीने फिर्यादीचे साक्षीदाराचे घराचे कुलूप कोंडा तोडुन घरातील पेटीत ठेवलेले सोन्या चांदीचे दागिने किंमती ७५,७००/-रु व नगदी १०,०००/-रु व साक्षीदार, गोविंद केंद्रे यांचे घराचे दाराचे कुलूप ताडुन पेटीतील सोन्या चांदीचे दागीने व रोख रक्कम ५२,०००/-रु असे एकुण १,८५,०००/-रु व भारतबाई बालाजी केंद्रे यांच घराचे चॅनल गेटचे कुलूप तोडुन घरात प्रवेश करुन सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम १७,०००/-रु एकुण १,१०,०००/-रु असे एकुण ३,८१,५००/-रु चा मुद्देमाल चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी संग्राम पि. विठ्ठल चाटे, वय ६५ वर्षे, व्यवसाय शेती रा. पोखर्णी ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे कंधार** गुरनं १७३/२०१९ कलम ४५७, ३८०, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/१६४९ केंद्रे, मो.नं. ९४२३५८६७५४** हे करीत आहेत.

## २) मो.सा.चोरी :-

**विमानतळ :-** दिनांक ०४.०७.२०१९ चे २२.३० ते दि. ०५.०७.२०१९ चे ०७.०० वा. चे दरम्यान, नेमानियानगर चैतन्यनगर स्टॉप जवळ, नांदेड येथे, यातील फिर्यादीने त्यांची हिरो स्पलेंडर प्लसे कंपणीची मो.सा. क्र.एम.एच.२६/वाय -४९८९ किंमती ३०,०००/-रुपयाची अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी अब्दुल बशिर पि. अब्दुल रहिम अंसारी, वय ५१ वर्षे, व्यवसाय नौकरी रा. नेमानिया नगर चैत्यन्यनगर जवळ नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. विमानतळ** गुरनं १६२/२०१९ कलम ३७९ भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/१६५५ कुरुळेकर , मो.क्रं. ९९२३६९६७०४** हे करीत आहेत.

## ३) आत्महत्येस प्रवृत्त केले :-

**धर्माबाद :-** दिनांक २२.०७.२०१९ रोजी चे ०८.०० वा. चे पुर्वी एक महिन्या पासुन कारला व नायगाव, जि. नांदेड येथे, यातील **मयत नामे पिराजी पोशट्टी आमेटवार, वय ३५ वर्षे, रा. साठेनगर धर्माबाद** हा आरोपीच्या शेतात नौकर असल्याने त्यास उचल दिलेले १०,०००/-रु घेतले होते. ते परत करण्याचे कारणावरुन यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन हातपाय तोडण्याची धमकी दिल्याने त्यांचे जाचास कंठाळुन संत गोरोबा काका मंदीर साठेनगर धर्माबाद येथे स्लॅपचे कडीला दोरी बांधुन गळफास घेऊन मरण पावला. यातील मयताचे मरणास कारणीभुत झाला. वगैर **फिर्यादी शिवराणी भ्र. पिराजी आमेटवार, वय २५ वर्षे, व्यवसाय घरकाम रा. साठेनगर धर्माबाद** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं. १४८/२०१९ कलम ३०६, ३४ भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/रत्नदीप गायकवाड , मो.क्र. ८७६६८९५७६६** हे करीत आहेत.

## ४) गंभीर दुखापत :-

**विमानतळ :-** दिनांक १४.०७.२०१९ रोजी चे १६.३० वा. चे सुमारास, महाराणा प्रताप चौक येथील दारु अडयावर नांदेड येथे, यातील नमुद आरोपीने फिर्यादीस दारु पिऊन दारुच्या नशेत शिवीगाळ केली व वाद केला. फिर्यादी बाहेर येऊन फोन लावत असतांना गळयावर डाव्या बाजुस कटरने मारुन गंभीर दु:खापत केली. वगैरे **फिर्यादी प्रतापसिंह पि बाबुसिंह ठाकुर, वय ४० वर्षे, व्यवसाय मजुरी रा. पार्डी ता. अर्धापुर जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं १६३/२०१९ कलम ३२६, ५०४, भादंवि कायद्या प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/पठाण , मो.क्र. ८८०५१८६११३** हे करीत आहेत.

## ५) बेकायदेशिर हत्यार बाळगणे :-

**इतवारा :-** दिनांक २१.०७.२०१९ राजी चे २३.३० वा. चे सुमारास, हबीब टॉकिज समोरील रोडवर इतवारा नांदेड येथे, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिर रित्या ०१ खंजर, ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/१२५२ हरी अण्णाराव शिंदे, ने. पोस्टे इतवारा** यांनी दिलेल्या फिर्यादीवरून **पोस्टे इतवारा** गुरनं १४६/२०१९ ,कलम ४/२५, अर्मस ॲक्ट, कायदया प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/९७९ माडगे, मो.क्र. ७५०७५२७४७९** हे करीत आहेत.

## ६)जुगार :- (१) गुन्हे

**मुखेड :-** दिनांक २२.०७.२०१९ रोजी चे १६.०५ वा. चे सुमारास, मौ. धामनगाव ता. मुखेड जि. नांदेड येथे, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या झन्ना मन्ना नावाचा जुगार खेळत असतांना नगदी ६२०/-रु चे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि /मिथुन विश्वनाथ सावंत, ने. पोस्टे मुखेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पोस्टे मुखेड** गुरन २३१/२०१९ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना /२१३१ गारोळे , मो.क्र. ८६०५२५२५५५** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४

# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. २३७/२०१९ दिनांक २३/०७/२०१९**

<u>संतोष आव्हाळेकडुन फसवणुक झालेल्या व्यक्तींना तक्रार करण्याचे आवाहन</u>

सन २०१५ मध्ये संतोष शामराव आव्हाळे व त्याच्या साथीदारांनी जिल्हा परिषद शाळांमध्ये संगणक ऑपरेटर म्हणुन सरकारी नौकरी लावतो असे आमिष दाखवुन जिल्हयातील सुमारे ६० ते ७० युवक -युवतींची फसणुक केली होती. त्या संदर्भाने दिनांक ३०.०४.२०१८ रोजी सदर आरोपीविरुध्द विमानतळ पोस्टे गु.र.नं. १०२/२०१८ कलम ४२०, १२०(ब), ४६७, ४६८, ४७१, ३४, भादवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या या गुन्हयाचा तपास आर्थिक गुन्हे शाखा, नांदेड यांचेकडुन करण्यात येत आहे.

सदर गुन्हयाचे तपासात आज पावेतो फसवणुक झालेल्या २२ उमेदवारांनी तक्रार नोंदवली आहे. तरी ज्या उमेदवारांनी अद्याप पर्यंत तक्रार नोंदविली नाही त्यांनी आर्थिक गुन्हे शाखा, नांदेड येथे, तक्रार नोंदविण्याचे आवाहन आर्थिक गुन्हे शाखेकडुन करण्यात आले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४